www.attalmat.com

अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-25 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, २३ फेब्रुवारी 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

संत गाडगे बाबा : समाजसंतांच्या परंपरेतील एक तेजस्वी

सविस्तर वृत्त पान २ वर

सहा. दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांच्यावर वरदहस्त असल्यामुळेच कारवाईस टाळाटाळ करण्यात येत आहे की काय?

'शासकीय यंत्रणेचा वापर करून कारवाई करण्यात यावी'

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

शहरातील रजिस्ट्री कार्यालयात बोगस एन.ए. (अकृषिक) आदेशांच्या आधारे नियमबाह्य जमीन दस्तनोंदणी करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असल्याचे समोर आला आहे. या प्रकरणी सहायक दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी भिमशक्ती सामाजिक संघटनेने केली आहे.

या गैरप्रकारात सह जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांच्या भूमिकेचीही सखोल चौकशी करावी, बोगस एन.ए. दस्तनोंदणी प्रकरणात भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई नाही तर बेमुदत उपोषण करू असा भिमशक्तीच्या महिला जिल्हाध्यक्षा सौ. मीनाताई मोहन काकडे यांनी संघटनेच्या वतीने दिला आहे.

सय्यद रसूल यांच्यावर सह. जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांचा हात असल्याची रजिस्टी कार्यालयात जोरदार चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांनी नाव न सांगण्याच्या अटीवर 'अट्टल मत'ला दिली होती. यावर सविस्तर वृत्त प्रसिद्धही ९ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. सहा. निबंधक सय्यद रसूल यांच्यावर कारवाई करण्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. अट्टलमतच्या पत्रकारांनी या प्रश्नी सह.जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांनी या प्रकरणी चौकशी कुठपर्यंत आली आहे. याची विचारणा केली असता त्यांनी कारवाईवर उत्तर न देता उलट टाळाटाळ करत असल्याचे दिसून आले. ते म्हणाले की, तुमच्याकडे जे पुरावे आहेत ते आम्हाला द्या, आम्ही त्याच्यावर कारवाई करतो असे विवेक गांगुर्डे यांनी सांगितले. पत्रकारांनी आपले काम केले आहे आता साहेब तुम्ही त्यावर कडक कारवाई करून आपल्या कार्यालयाचे नाव बदनाम होण्यापासून वाचवावे असे आम्हाला वाटते. पत्रकारांनी सांगितले की, साहेब आम च्यापेक्षा तुम्हालाच जास्त माहिती लवकर व स्पष्टपणे मिळू शकते. आम्ही हे प्रकरण समोर आणले आहे. त्यामुळे आम्ही पुरावे देण्यापेक्षा तुम्ही त्यात जास्तीत जास्त लक्ष घालून कारवाई करावी असे वाटते. आम्हाला काय करायचे ते आम्ही करू, परंतु त्यात जास्त वेळ लागेल सर्व कागदपत्रांची आम्हाला चाचपणी करावी लागेल तरच कारवाई करू शकतो असे सह.जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांनी सांगितले. मात्र त्यांच्या याभूमिकेमुळे अजूनही किती बोगस नियमबाह्य जमीन नों दणी होईल ते मात्र सांगता येत नाही, अशी परिस्थिती आहे. ती योग्य नाही.

छत्रपती संभाजीनगर दस्त नोंदणी कार्यालयात 'दलालराज'चा आरोप; अमरण उपोषणाचा इशारा

छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा निबंधक (दस्त नोंदणी/रजिस्ट्री) कार्यालयात कथित गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप करत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.एका संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत आठ दिवसांत ठोस कारवाईची मागणी केली आहे.

माहिती अधिकारातून २०२१ मध्ये सुमारे १६ हजार बोगस दस्त नोंदणी झाल्याचा दावा समोर आला होता. बोगस कागदपत्रांवर नोंदणी, टुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन तसेच दलाल-अधिकारी संगनमताच्या तक्रारींमुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. जमीन खरेदी-विक्री व्यवहारासाठी दलालांशिवाय काम होत नसल्याची भावना नागरिकांत पसरली आहे. अधिकृत शुल्क भरूनही हजारो रुपयांची अतिरिक्त वसुली होत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. सोयगाव, सिल्लोड, कन्नड, गंगापूर, खुलताबाद, वैजापूर, पैठण व फुलंब्री तालुक्यातील कार्यालयांमध्येही अशीच स्थिती असल्याचा दावा करण्यात आला आहे. कार्यालय दलालमुक्त घोषित करणे, बोगस नोंदणींची स्वतंत्र चौकशी, सीसीटीव्ही व टोकन प्रणाली सुरू करणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. आठ दिवसांत कारवाई न झाल्यास अमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

सरकारचा मोठा निर्णय; ५१ हजार पोलिसांना लागू होणार नवा नियम

मुंबई : पोलीस दलातील शिस्त आणि गांभीर्य टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला आहे. आता पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेशात रील, मिनी-व्लॉग किंवा कोणत्याही प्रकारचे व्हिडिओ समाजम ाध्यमांवर पोस्ट करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मुंबईतील ५१ हजार पोलीस कर्मचाऱ्यांना हा नियम लागू असेल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर शिस्तभंगविषयक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. अनेक वेळा पोलीस आपल्या वर्दीमध्ये रिल करताना दिसत होते. त्याबाबतच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे हा निर्णय घ्याला लागला आहे.

विशेष शाखेचे उपायुक्त दत्तात्रेय कांबळे यांनी गुरुवारी परिपत्रक काढून स्पष्ट केले की, अनेक कर्मचारी गणवेशात व्हिडिओ बनवताना कर्तव्यावरील संवेदनशील ठिकाणे, सरकारी वाहने आणि शस्त्रे यांचे चित्रीकरण करतात. यामुळे ऑपरेशनल सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. विधीमंडळातही काही आमदारांनी हा मुद्दा उपस्थित केला होता, ज्याची दखल आता प्रशासनाने घेतली आहे.

या नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या सोशल मीडिया लॅबला विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. 'खाकी स्वॅग' सारख्या ट्रेंडवर आता पूर्णपणे बंदी येणार असून, खासगी आयुष्य आणि कर्तव्य यांची सरमिसळ टाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून 'खाकी स्वॅग' नावाचा ट्रेंड पोलिसांमध्ये लोकप्रिय झाला होता. मात्र, यामुळे कर्तव्यावरील गोपनीयता भंग पावत असल्याची तक्रार होती.

पोलीस दलाची प्रतिष्ठा जपण्यासाठी सोशल मीडियाचा वापर केवळ वैयक्तिक कामासाठीच करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विधानसभेतही लोकप्रतिनिधींनी या विषयावर चिंता व्यक्त केली होती. त्यांनतर आता पोलीस प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

मुंबई पोलिसांची सोशल मीडिया लॅब आता सर्व प्लॅटफॉर्मवर लक्ष ठेवून असेल, जेणेकरून नियमांचे उल्लंघन होणार नाही. ज्याच्याकडून याचे उल्लंघन होईल त्याच्यावर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे आता अशा व्हिडीओना चाप बसण्यास मदत होईल.

'दलालांशिवाय व्यवहार नाही' नागरिकांची हतबलता

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

दस्त नोंदणी (रजिष्ट्रि कार्यालय) परिसरात दलालांनी उघडपणे दुकाने थाटल्याचे चित्र आहे. दलालांशिवाय जम ीन खरेदी- विक्रीचा व्यवहार होत नाही, अशी भावना नागरिकांत पसरली आहे. एक दस्त नोंदणी करण्यासाठी हजारो रुपयांची अतिरिक्त वसुली केल्याच्या तक्रारी आहेत. चालानची अधिकृत रक्कम भरूनही व्यवहार करणाऱ्यांकडून रोख स्वरूपात जादा पैसे घेतले जात असल्याचा आरोप आहे. यामुळे शेतकरी व गरीब नागरिक आर्थिकदृष्ट्या लुटले जात असल्याची खंत व्यक्त होत आहे.

तालुकास्तरावरही तीच स्थिती

सोयगाव, सिल्लोड, कन्नड, गंगापूर, खुलताबाद, वैजापूर, पैठण, फुलंब्री आदी तालुक्यांतील दस्त नोंदणी कार्यालयांमध्येही दलालांचे वर्चस्व असल्याची तक्रार करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यातील रजिस्ट्रेशन कार्यालय दलालमुक्त झाले पाहिजे, अशी एकमुखी मागणी संघटनेने केली आहे.

मुलांना तणावमुक्त ठेवा

मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा बारावी-दहावी परीक्षा राज्यात सुरू झाल्या आहेत. या परीक्षेच्या कार्यकाळात मुलं अभ्यासाच्या तणावातून जात असतात. तेव्हा पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमि तपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दररोज करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

संत गाडगे बाबा : समाजसंतांच्या परंपरेतील एक तेजस्वी

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी जन्माला आली आहेत की ज्यांनी कोणतीही सत्ता, राजकीय पद, संपत्ती किंवा संघटनात्मक बळ न वापरता समाजमनावर खोलवर आणि दीर्घकालीन प्रभाव टाकला आहे. ही व्यक्तिमत्त्वे लोकांच्या जीवनाशी एकरूप झाली, त्यांच्या दुःखांशी संवाद साधला आणि कृतीतून परिवर्तनाचा मार्ग दाखवला. अशाच थोर समाजसंतांच्या परंपरेतील एक तेजस्वी, पण अत्यंत साधा दीप म्हणजे संत गाडगे बाबा होय. २३ फेब्रुवारी हा दिवस त्यांच्या जयंतीचा असला तरी तो केवळ एका संताचा जन्मदिन नाही, तर सामाजिक स्वच्छता, मानवतावाद, विवेकनिष्ठ अध्यात्म, श्रमप्रतिष्ठा आणि समतेच्या मूल्यांचा सार्वजनिक उत्सव आहे. संत गाडगे बाबांचे जीवन हे वैयक्तिक मोक्षसाधनेपेक्षा सामाजिक उद्धारासाठी समर्पित होते.

संत गाडगे बाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डेबूजींना बालपणापासूनच दारिद्र्य, कष्ट, उपासमार आणि सामाजिक विषमतेचा सामना करावा लागला. औपचारिक शिक्षण फारसे मिळाले नाही, परंतु जीवनाच्या शाळेतून त्यांनी जे शिक्षण घेतले ते अत्यंत व्यापक, खोल आणि समाजपरिवर्तनाची दिशा देणारे होते. लहान वयातच त्यांनी ग्रामीण समाजातील अस्वच्छता, अंधश्रद्धा, दारूचे व्यसन, जातिभेद, कर्मकांड आणि स्त्रियांची दुर्दशा यांचे विदारक चित्र पाहिले. या वास्तवाने त्यांचे मन अस्वस्थ झाले आणि हीच अस्वस्थता पुढे समाजप्रबोधनाची प्रेरणा ठरली.

गाडगे बाबांचे आयुष्य पारंपरिक अर्थाने संन्यस्त नव्हते. त्यांनी कोणताही मठ स्थापन केला नाही, आश्रम उभारला नाही किंवा औपचारिक शिष्यपरंपरा चालवली नाही. त्यांच्या हातात ग्रंथाऐवजी झाडू होती, अंगावर फाटकी वस्त्रे होती आणि चेहऱ्यावर समाजासाठी झिजणाऱ्या माणसाचे तेज होते. त्यांनी लोकांना सांगितले की देव दगडात नाही, तो माणसात आहे; पूजा कर्मकांडात नाही, ती सेवेत आहे; आणि अध्यात्म पलायनात नाही, तर समाजाशी बांधिलकी ठेवण्यात आहे. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन गावोगावी सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली आणि स्वच्छतेला नैतिक व आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून दिले.

स्वच्छता हा संत गाडगे बाबांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता, पण ती केवळ भौतिक स्वच्छतेपुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या दृष्टीने स्वच्छता म्हणजे विचारांची, वर्तनाची आणि सामाजिक रचनेची स्वच्छता होती. अस्वच्छ परिसर म्हणजे रोगांना आमंत्रण, रोग म्हणजे दारिद्र्य आणि दारिद्र्य म्हणजे अज्ञान, अशी साखळी त्यांनी लोकांना समजावून सांगितली. स्वच्छता म्हणजे आरोग्य, आणि आरोग्य म्हणजेच समाजाचा खरा धर्म, ही त्यांची ठाम भूमिका होती. आज स्वच्छतेवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा होते, परंतु शंभर वर्षांपूर्वी गाडगे बाबांनी ही चळवळ प्रत्यक्ष कृतीतून सुरू केली होती.

गाडगे बाबांचे समाजप्रबोधन हे भाषणांपुरते मर्यादित नव्हते. ते स्वतः नाल्या साफ करत, कचरा उचलत, धर्मशाळा, बाजारपेठा आणि यात्रास्थळे स्वच्छ करत आणि त्याच वेळी लोकांशी संवाद साधत. त्यांच्या कीर्तनांमध्ये चमत्कार, अवतारकथा किंवा भीतीवर आधारित धर्म नव्हता. त्यांच्या कीर्तनांचा केंद्रबिंदू होता शिक्षण, विवेक, व्यसनमुक्ती, जातिभेदाचा निषेध आणि स्त्रीपुरुष समानता. साध्या, लोकभाषेतील उदाहरणांनी ते गंभीर सामाजिक प्रश्न मांडत आणि त्याम ुळे सामान्य माणसाला ते आपले वाटत.

दारूचे व्यसन हे ग्रामीण समाजाच्या अधःपतनाचे एक मोठे कारण आहे, हे गाडगे बाबांनी अचूक ओळखले होते. दारूमुळे कुटुंब उद्ध्वस्त होते, महिलांवर अत्याचार वाढतात, मुलांचे शिक्षण बिघडते आणि आर्थिक परिस्थिती ढासळते. म्हणूनच त्यांनी दारूबंदीचा आग्रह धरला. त्यांनी व्यसन करणाऱ्यांवर टीका केली, पण द्वेष केला नाही. परिवर्तन हे दंडाने नव्हे, तर प्रबोधनाने होते, हा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या प्रभावामुळे अनेक गावांमध्ये दारूची दुकाने बंद झाली आणि व्यसनमुक्तीचे वातावरण निर्माण झाले. शिक्षणाबाबत गाडगे बाबांची भूमिका अत्यंत स्पष्ट आणि दूरदृष्टीची होती. विद्या विणा मती गेली, मती विणा नीती गेली, नीती विणा गती गेली, गती विणा वित्त गेले, या ओळींमधून त्यांनी शिक्षणाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी किंवा पद मिळवण्याचे साधन नसून विवेक, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करणारी प्रक्रिया आहे, असे ते मानत. त्यांनी गरीब, अनाथ आणि वंचित मुलांच्या शिक्षणासाठी निधी गोळा केला आणि अनेक शाळा, वसतिगृहे व शैक्षणिक उपक्रमांना मदत केली. जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींवर गाडगे बाबांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली. त्यांनी सर्व माणसे समान आहेत, ही भूमिका केवळ शब्दांत न ठेवता कृतीतून दाखवली. त्यांनी दलित वस्त्यांमध्ये जाऊन स्वच्छता केली.

त्यांच्या सोबत भोजन केले आणि त्यांना माणूस म्हणून सन्मान दिला. देव जर सर्वांचा निर्माता असेल, तर माणसामाणसात भेद कसा, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला. त्यांच्या विचारांमध्ये संत तुकाराम, संत कबीर आणि महात्मा फुले यांच्या परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. स्त्रियांच्या प्रश्नांबाबतही गाडगे बाबांची भूमिका प्रागतिक होती. त्यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले, बालविवाहाचा निषेध केला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. समाजाचा खरा विकास तेव्हाच होतो, जेव्हा स्त्रियांना सन्मान, शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळते, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्त्रीपुरुष समानतेचा संदेश दिला आणि कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे महत्त्व अधोरेखित केले.

गाडगे बाबांचे अध्यात्म कर्मकांडविरहित आणि विवेकनिष्ठ होते. उपास, व्रत, तीर्थयात्रा यांपेक्षा उपाशी माणसाला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि अज्ञान दूर करणे हेच खरे पुण्यकर्म आहे, असे ते मानत. त्यांनी अंधश्रद्धेचा तीव्र निषेध केला आणि श्रद्धेला विवेकाची जोड दिली. त्यांचे अध्यात्म माणसाला माणूस बनवणारे होते.

गाडगे बाबांचे जीवन म्हणजे सतत चालत राहण्याचे, भटकंतीचे जीवन होते. त्यांच्या पायात चप्पल नव्हती, डोक्यावर छत्री नव्हती, आणि खांद्यावर एक झोळी होती. या झोळीतून त्यांनी लोकांकडून मिळालेला पैसा स्वतःसाठी कधीही वापरला नाही. तो पैसा सम ाजकार्यासाठी, शिक्षणासाठी आणि गरजूंना मदतीसाठी खर्च केला. त्यांनी संपत्ती साठवली नाही, कारण त्यांच्या मते समाजसेवेतच खरे वैभव आहे. आजच्या काळात, जेव्हा धर्माचे राजकारण केले जाते, अध्यात्माचे व्यापारीकरण झाले आहे आणि समाजमाध्यमांवर दिखाऊ सेवाभाव दिसतो, तेव्हा संत गाडगे बाबांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी संस्था उभारली नाही, पण विचारांची चळवळ निर्माण केली. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत, पण त्यांचे संपूर्ण जीवनच एक चालते-बोलते ग्रंथ होते. २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबांची जयंती साजरी करताना केवळ प्रतिमापूजन, भाषणे किंवा मिरवणुका पुरेशा नाहीत. त्यांच्या विचारांचे आचरण हेच खरे अभिवादन आहे. परिसराची स्वच्छता राखणे, अंधश्रद्धेला विरोध करणे, व्यसनांपासून दूर राहणे, शिक्षणाला प्राधान्य देणे, जातिभेद नाकारणे आणि मानवतेला धर्म मानणे हीच गाडगे बाबांची शिकवण आहे. संत गाडगे बाबा हे केवळ एका जातीचे, एका प्रदेशाचे किंवा एका काळाचे नव्हते. ते संपूर्ण मानवजातीचे होते. त्यांनी समाजाला आरसा दाखवला, प्रश्न विचारायला शिकवले आणि बदलाची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही आजच्या काळाची गरज आहे. कारण जिथे स्वच्छता, समता, विवेक आणि करुणा आहे, तिथेच खरा धर्म आहे आणि हाच संत गाडगे बाबांचा अमर संदेश आहे.

– डॉ. राजेंद्र बगाटे

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील जलसंवर्धन कार्य

छत्रपती शिवाजी महाराज यांची ओळख स्वराज्य निर्माता म्हणून जितकी आहे तितकीच रयतेचा राजा म्हणून देखील आहे. आपल्या स्वराज्यात असणारी प्रजा ही सर्वाधिक महत्वाची आहे.. त्यांच्या समस्या सोडवणे याला प्राधान्य असले पाहिजे याबाबत ते आग्रही होते.

राजांची ओळख कुशल प्रशासक म्हणून देखील आहे. यासोबतच रयतेचा राजा म्हणून त्यांनी शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या रयतेसाठी असणारे पाण्याचं महत्व जाणलं आणि यासाठी त्यांनी जलसंवर्धन कार्याला वेगळे आयाम दिले. त्यांचे याबाबतीत असलेला अभ्यास आणि धोरणीपणा आजच तितकाच मोलाचा ठरतो.

आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी नवी नाही. त्याकाळी आणि आजही शेती पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळेच त्यांचे या क्षेत्रात असणारे योगदान आजही मार्गदर्शक असे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात जलव्यवस्थापनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. पाणी ही केवळ जीवनावश्यक गरज नसून शेती, लोककल्याण आणि किल्ल्यांची सुरक्षा यासाठीही ते तितकेच आवश्यक आहे, याची महाराजांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे त्यांच्या काळात जलसंवर्धन, पाणी साठवण आणि योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला.

भौगोलिक परिस्थितीची जाण

महाराष्ट्राचा मोठा भाग डोंगराळ व पावसावर अवलंबून आहे. विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये पाण्याचे स्रोत ऋतुनिष्ठ असतात. ही परिस्थिती ओळखून शिवाजी महाराजांनी पावसाचे पाणी अडवणे आणि साठवणे यावर भर दिला.

किल्ल्यांवरील जलव्यवस्था

शिवकालीन किल्ले ही जलसंवर्धनाची उत्कृष्ट उदाहरणे मानली जातात.

रायगड किल्ला, राजगड किल्ला यांसारख्या किल्ल्यांवर:

- दगडात कोरलेली टाकी (पाण्याची टाकी) बांधण्यात येत
- पावसाचे पाणी साठवण्यासाठी तलाव तयार केले जात
- झऱ्यांचे पाणी सुरक्षित मार्गाने टाक्यांमध्ये आणले जात
- किल्ल्यावर वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा राखला जाई यामुळे दीर्घकालीन वेढ्यातही किल्ले टिकून राहत.

लोकाभिमुख धोरण – शिवाजी महाराजांच्या प्रशासनात प्रजेच्या गरजांना प्राधान्य होते. गावागावांत विहिरी, तलाव, बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले जाई. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध राहावे यासाठी लहान सिंचन व्यवस्थाही उभारल्या गेल्या आणि त्यामुळे गावागावात पाण्याची उपलब्धता सातत्यपूर्ण होती ज्यामुळे जीवनाला स्थैर्य प्राप्त होऊ शकले. गावालगत असणाऱ्या मंदिरालगत असणाऱ्या विहिरी आणि बारव आपण आज ही अस्तित्वात आहेत असे बघतो.

पर्यावरणपूरक दृष्टीकोन – जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी जंगलांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. डोंगरउतारांवरील झाडी राखल्याने पाणी धरून ठेवण्यास मदत होते, याची जाण त्या काळातही होती. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा समतोल राखण्याची परंपरा दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलसंवर्धन कार्य हे दूरदृष्टी, शास्त्रीय विचार आणि स्थानिक भौगोलिक जाण यांचे सुंदर मिश्रण होते. आजच्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर शिवकालीन पाणी व्यवस्थापन आपल्याला शाश्वत जलवापराचा मौल्यवान धडा देते. त्यांच्या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेऊन आधुनिक काळातही जलसंवर्धन अधिक प्रभावीपणे राबवता येऊ शकते.

– प्रशांत दैठणकर
९८२३१९९४६६

शिवजयंती मिरवणुकीतील ऐतिहासिक देखाव्यांना बक्षिसे; १५ मे रोजी वितरण

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

सर्व धर्म समभाव जयंती उत्सव महासंघाच्या वतीने यावर्षी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या रथांमधील ऐतिहासिक सजीव व निर्जीव देखाव्यांना विशेष बक्षिसे देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी उत्कृष्ट देखाव्यांचे परीक्षण करून विजेत्यांची निवड केली जाणार असून बक्षिसांचे वितरण १५ मे २०२६ रोजी प्रख्यात लोककवी वामनदादा कर्डक यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

महासंघाने संबंधित मंडळे, संघटना तसेच रथ सजावटीत सहभागी होणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना उत्साहाने सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले आहे. याच अनुषंगाने सर्वधर्मीय जयंती उत्सव महासंघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात शिवरायांच्या पराक्रमावर आधारित गीते, पोवाडे सादर करण्यात आले तसेच त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे विचार मान्यवरांनी मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲडव्होकेट नरहरी कांबळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मधुकर भोळे साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे यांनी केले.

सांस्कृतिक कार्यक्रमात शाहीर उत्तमरावजी मस्के, शाहीर संभाजी गायकवाड, गीता भीमराव यांची कन्या, पंचशीला भालेराव, भालेराव जायभाय तसेच नाडे साहेब आदी कलाकारांनी शिवराय आणि भीमराय यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रेरणादायी गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या शेवटी पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे यांनी उपस्थित मान्यवर, कलाकार व नागरिकांचे आभार मानले. मोठ्या उत्साहात आणि सर्वधर्मीय बंधुभावाच्या वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

राज्यात 'लव्ह जिहाद व अवैध धर्मांतर विरोधी' कायदा तात्काळ करण्याच्या मागणीला जोर

मुंबई : गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद' आणि 'अवैध धर्मांतर' या गंभीर समस्यांविरोधात कायदा करण्यासाठी हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी जनआक्रोश मोर्चे काढले. त्यावेळी सरकारने या विषयाचे गांभीर्य ओळखून 'लव्ह जिहाद' विरोधात कठोर कायदा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजही दुर्दैवाने या घटना थांबलेल्या नाहीत, उलट त्यांची तीव्रता आणि क्रूरता वाढतच चालली आहे. आता सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण करण्याची वेळ आली आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांप्रमाणे गुन्हेगाराला जन्मठेप शिक्षा देणारा कठोर आणि अजामीनपात्र स्वरूपाचा 'लव्ह जिहाद' व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' येत्या अधिवेशनात तात्काळ संमत करावा अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने राज्यशासनाकडे केली आहे.

या दृष्टीने समितीने मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्याकडे राज्यभरातील विविध जिल्ह्यातील एकूण ७५ हून अधिक ठिकाणी स्थानिक जिल्हा आणि तालुका प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतीनिधींमार्फत निवेदने दिली. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, छ. संभाजीनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, बीड, धाराशिव, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती, वाशिम, चंद्रपुर, नागपुर आदी जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने महिला व हिंदुत्वनिष्ठांनी एकत्रित येत निवेदनाच्या मार्फत वरील मागण्या केल्या आहेत.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (छउठइ) अहवालानुसार महाराष्ट्रातून बेपत्ता असलेल्या १,७८,००० हून अधिक महिला आणि मुलींचा शोध घेण्यासाठी 'विशेष मोहीम' राबवावी आणि त्यातील 'लव्ह जिहाद'ची प्रकरणे वेगळी नोंद करावीत. 'लव्ह जिहाद'चे प्रकार अजूनही सर्रास घडत आहेत.

याची गंभीरता पाहता प्रत्येक जिल्ह्यात पोलीस उपअधीक्षक (ऊहइझ) दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली 'लव्ह जिहाद विरोधी विशेष पथक' स्थापन करून 'लव्ह जिहाद'च्या प्रकरणांचा निकाल ६ महिन्यांच्या आत लागावा, यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावीत. याविषयी विदेशातून येणारा निधी, जिहादी नेटवर्क आणि तस्करीचा सखोल तपास करून मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह करण्यापूर्वी किमान ६० दिवस आधी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आणि पोलीस चौकशी होणे बंधनकारक करावे या मागण्याही समितीने दिलेल्या निवेदनात केल्या आहेत.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर सिडको एन.७ छत्रपती संभाजीनगर येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती मोठ्या हर्ष उल्हासात साजरी करण्यात आली .

या कार्यक्रमास विशेष प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्याध्यापक श्री प्रकाश सोनवणे व संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली व अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संदीप सोनवणे यांनी केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर सुरेख पोवाडा सादर केला तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.सुनील चौधरी साहेबराव शिंदे नजमा खान संजय चौधरी विजय पाटील वैशाली बागुल हर्षल पगारे रत्नमाला घोरपडे सुनिता शेजवळ यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी संस्थेच्या वतीने सर्व मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे यांनी केले.

बुलढाणा : नोंदणी व मुद्रांक विभागातील ज्येष्ठ अधिकारी

साहेबराव दुतोंडे सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न; ३२ वर्षांच्या सेवेला भावपूर्ण निरोप

बुलढाणा
(अट्टल मत प्रतिनिधी)

नोंदणी व मुद्रांक विभागातील ज्येष्ठ अधिकारी साहेबराव नामदेवराव दुतोंडे (उप-महानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक, नागपूर/अमरावती विभाग) यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ उत्साहात व भावपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गजानन महाराज यांना अभिवादन करून उपस्थित मान्यवर, अधिकारी व कर्मचाऱ्यांना नमस्कार करण्यात आला.

आपल्या मनोगतात दुतोंडे यांनी सांगितले की, दिनांक २३ जून १९९३ रोजी मलकापूर येथे त्यांनी सेवेला प्रारंभ केला होता आणि आज त्याच बुलढाणा जिल्ह्यात सेवापूर्ती होत असल्याचा आनंद व्यक्त केला. तब्बल ३२ वर्षे ७ महिने ७ दिवसांच्या प्रदीर्घ सेवाकाळाचा आढावा घेताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला.

नोंदणी व मुद्रांक विभागाने आपल्याला केवळ नोकरीच नाही तर जिवाभावाची माणसं, आर्थिक स्थैर्य आणि समाजात मान-सन्मान दिला, असे सांगत त्यांनी सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तुमच्यासारखे सहकारी लाभल्यामुळे कामाचा ताण कधी जाणवला

नाही, असेही त्यांनी नमूद केले.

सेवाकाळातील अनुभव सांगताना त्यांनी सांगली जिल्ह्यात कोविड काळात ११ केंद्रांची जबाबदारी सांभाळताना रुग्णांची विचारपूस, अन्न व औषधांची व्यवस्था आणि वैद्यकीय सेवांवर लक्ष ठेवण्याचे कार्य केल्याचे सांगितले. तसेच २०२१ मधील महापुरावेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने सुमारे ४ लाखांची मदत जमा करून पुरग्रस्तांना शिधा वाटप करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. सोलापूर येथे मुद्रांक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना विविध संस्थांकडील थकीत मुद्रांक शुल्काची प्रभावी वसुली करून 'सोलापूर पॅटर्न' विकसित करण्यात आला. या कामाची दखल घेत तत्कालीन महानिरीक्षकांनी हा पॅटर्न राज्यभर राबवण्याचे निर्देश दिले होते. तसेच मुंबई येथे कार्यरत असताना ध्वजनिधी संकलनात सलग तीन वर्षे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते राजभवनात सत्कार झाल्याचा उल्लेख त्यांनी अभिमानाने केला. यानंतर नागपूर विभागात उप-महानिरीक्षक पदावर कार्यरत असताना अनेक कार्यालयांच्या इमारत प्रस्तावांना गती देऊन नवीन इमारती उभारण्यात आल्या तसेच कार्यालयांचे सुशोभीकरण करण्यात आले, असे त्यांनी सांगितले. आपल्या यशामध्ये कुटुंबीयांचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद करत, कार्यालयीन जबाबदाऱ्या पार पाडताना कुटुंबाची साथ हीच खरी ताकद असते, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. शेवटी त्यांनी सहकाऱ्यांना भावनिक निरोप देताना, सहवास सुटला तरी नातं तुटत नाही, असे सांगत सर्वांचे आभार मानले. उपस्थितांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हा सेवानिवृत्ती सोहळा उपस्थितांच्या स्मरणात कायम राहील, असे वातावरण कार्यक्रमात पाहायला मिळाले.

जागतिक बौद्ध धम्मगुरु अहंत भदंत डॉ. आशिन उत्तमत्तारा यांच्या हस्ते होणार जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

७० वर्षानंतर भीम टेकडी येथे होणाऱ्या पाच दिवसीय जागतिक बौद्ध धम्म परिषदेची तयारी पूर्ण झाली असून या परिषदेचे उद्घाटन जागतिक बौद्ध धम्म गुरु अहंत परमपूज्य भदंत आशिन उत्तमत्तारा यांच्या हस्ते २६ फेब्रुवारी रोजी होणार असल्याची माहिती धम्म परिषदेच्या मुख्य संयोजिका प्रा.भिक्खुनी धम्मदर्शना महाथेरी यांनी शुक्रवार दि.२० फेब्रुवारी रोजी एका पत्रकार परिषदेत दिली

२६,२७,२८ फेब्रुवारी आणि १ व २ मार्च रोजी जटवाडा रोडवरील भीम टेकडी येथील विश्वशांती बुद्ध विहार परिसरामध्ये जागतिक बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे या धम्म परिषदेच्या तयारीच्या संदर्भात बोलताना प्रा.भिक्खुनी धम्मदर्शना महाथेरी म्हणाल्या १९५४ साली रंगून येथे पहिली जागतिक धम्म परिषद झाली होती या परिषदेसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते त्यानंतर तब्बल ७० वर्षानंतर छत्रपती संभाजीनगरात जागतिक बौद्ध धम्म परिषद होत आहे या परिषदेसाठी ३० देशातील भिक्खू शहरात येत आहे ते बौद्ध उपासक उपासिकांना धम्मदेशना देणार आहे यासोबतच साहित्यिक, लेखक, विचारवंत यांची उपस्थिती राहणार आहे जागतिक

प्रा. भिक्खुनी धम्मदर्शना महाथेरी यांची पत्रकार परिषदेत माहिती

बौद्ध धम्म परिषदेची तयारी पूर्ण झाली असून असून ५० एकर जागेवरील मंडपात धम्मपरिषद होणार आहे परदेशातील भिक्खूंची निवासाची व्यवस्था हॉटेल आणि विश्रामगृहात करण्यात आलेले आहे जवळपास ५ हजार स्वयंसेवक जागतिक धम्म परिषदेसाठी कार्यरत राहतील अशा प्रकारची जागतिक धम्म परिषद छत्रपती संभाजीनगरात होत आहे २६ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता तथागत गौतम बुद्धांची पूजा व त्यानंतर धम्मध्वज फडकावून विश्वविपश्यनाचार्य जागतिक बौद्ध धम्मगुरु अहंत प.पू.भदंत डॉ. आशिन उत्तमत्तारा यांच्या हस्ते बौद्ध धम्म परिषदेचे उद्घाटन होणार आहे या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले पालकमंत्री संजय शिरसाठ आमदार नितीन राऊत यांच्यासह आमदार खासदार उपस्थित राहणार आहे परिषदेच्या तयारीसाठी एक वर्षापासून आम्ही परिश्रम घेत असल्याचे सांगून प्रा.भिक्खुनी धम्मदर्शना महाथेरी म्हणाल्या महाराष्ट्रातील तब्बल ३६ जिल्हे जिल्ह्यात फिरून जनजागृती केली आहे धम्म चळवळ वाढावी या उद्देशाने ही जागतिक धम्म परिषद होत आहे पाच दिवस सायंकाळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायकांचा भीमरजनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले या पत्रकार परिषदेला अनिलकुमार बस्ते डॉ. अरविंद गायकवाड संजय डोंगरे सी.पी. पाटील सुनील दांडगे निवृत्ती शिंदे सी.पी. पाटील सविता अभ्यंकर ज्योती दांडगे अनिकेत मोहोळ जोगेंद्र तायडे दीपक खंडारे आदी उपस्थित होते.

मनपा उस्मानपुरा शाळेने दिली आदरणीय आयुक्त साहेबांच्या निवासस्थानी भेट

स्वतः च्या मुलीसारखे मनपा शाळेतील मुलींना आयुक्त बसवतात शेजारी, शाळेतील लहान लहान विद्यार्थ्यासोबत आयुक्त साधतात प्रेरणादायी संवाद

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

मनपा आयुक्त जी श्रीकांत साहेब यांच्या संकल्पनेतून 'मी आयुक्त होणार' या नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत मनपा प्रा शाळा उस्मानपुरा या शाळेने जी श्रीकांत साहेब यांच्या जलश्री या निवासस्थानी भेट दिली. या शाळेची विशेषत: म्हणजे म्हणजे क्रांतीज्योती विद्यालय चित्रपटासारखी आहे कारण ही शाळा बंद होण्याच्या मार्गावर होती परंतु आदरणीय साहेबांच्या smart school to best school या प्रकल्पामुळे या शाळेला नव संजीवनी मिळाली आणि आज या शाळेत मराठी माध्यम ची तिसरी पर्यंतची ७ पटसंख्या वरून १६४ पटसंख्या झाली आहे तर cbse चे इयत्ता पाचवी पर्यंत वर्ग सुरू आहेत या चित्रपटात एक वाक्य आहे पुन्हा भरणार मराठी शाळा या प्रमाणे ही शाळा पुन्हा भरली आहे .

सकाळी दहा वाजता मराठी आणि CBSE चे विद्यार्थी ग्राउंड वर आले की खूप खूष झाले खो खो ,कबड्डी क्रिकेट हॉलिबॉल , फुटबॉल खेळ खेळायला सुरुवात केली त्यानंतर नवीनच चूहा - बिल्ली हा एक खेळ खेळताना विद्यार्थी दिसून आले तर डोंगराला आग लागली पळा पळा असा ही खेळ विद्यार्थी खेळले व एकत्रित माझ्या मामा चे पत्र हरवले या खेळाचा आनंद अगदी सर्व शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी घेतला त्यानंतर एकत्रित सर्वांनी निसर्ग भोजन घेतले भोजनानंतर विद्यार्थी आदरणीय सरांना भेटण्यासाठी जायचे म्हणू लागले आणि तेवढ्यात आदरणीय सरांची गाडी आलेली दिसली मुले आनंदित झाली मग सर्व मुले चित्रकला काढू लागले कोणी मी आयुक्त होणार असे लिहिले तर कोणी तेथील फुलांचे चित्र काढले तर कोणी तेथील ग्राउंड चे चित्र काढले आणि सर आल्याबरोबर विद्यार्थ्यांनी तीन टाळ्या वाजून सरांचे वेलकम म्हणून स्वागत केले असता सर म्हणाले नाही तुम्ही माझ्या घरी आला आहात मी तुमचे स्वागत करणार आणि मग सरांनी परत तीन टाळ्या वाजवून सर्व विद्यार्थ्यांना वेलकम म्हणाले

आणि विद्यार्थ्यांचे स्वागत केले तेवढ्यात अनन्या नावाची विद्यार्थिनी सरांजवळ गेली तिने सरांसोबत गप्पा गोष्टी केल्या शाळेत पुरविलेल्या विविध सोयी सुविधा त्या मध्ये विशेष करून smart साहित्य , क्रिकेट टर्फ,ग्राउंड वर खेळताना आनंद होत असल्याचे अनन्या म्हणाली त्यानंतर पंकजा या मुलीने संख्या ओळख चे मॅजिक तयार करून आणले होते ते सराना दाखविले .त्यानंतर प्रज्वल विद्यार्थ्यांनी मी आयुक्त होणार असल्याचे काढलेले चित्र साहेबाना दाखविले व सरांनी तुला आयुक्त का व्हायचे म्हणून विचारले असता त्याने खूप छान उत्तर दिले सरानी त्याला आयुक्त होण्यासाठी शुभेच्छा दिल्या नंतर छोट्या छोट्या चार मुलींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा पाळणा नृत्य सादर केले सरानी त्या चारही मुलीना शेजारी बसविले त्यानंतर दोन मुलींनी गणपती बाप्पाच्या गाण्यावर नृत्य सादर केले त्यानंतर एकत्रित आकाशगंगा या गीतावर सर्व विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. सदर भेट ही मा.अंकुश पांढरे उप आयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख, व गणेश दांडगे नियंत्रण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती मा.भारत तिनगोटे शिक्षणाधिकारी, रामनाथ थोरे शिक्षण विस्तार अधिकारी व ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी यांनी या साठी मेहनत घेतली तसेच या वेळी शशिकांत उबाळे मुख्याध्यापक, शुभांगी कदम सीमा कदम, विद्यूलता गोरे, पूजा उपस्थित होत्या.

फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा विजय : बालाजी सोनटक्के

अट्टलमत कार्यालयात नवनिर्वाचित जि.प. सदस्य बालाजी सोनटक्के जाहीर सत्कार सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

सडेतोड वृत्तपत्र अट्टलमत कार्यालय येथे छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद सदस्यपदी विजय मिळवल्याबद्दल, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त बालाजी सोनटक्के यांचा जाहीर नागरी सत्कार, समारंभ उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. एन-७ सिडको पोलीस स्टेशन शेजारील अट्टलमत कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमास पत्रकार, मान्यवर आणि नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. बालाजी सोनटक्के यांचा छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद सदस्यपदी विजय झाल्याबद्दल त्यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व एडिटर ॲण्ड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष रतनकुमार साळवे होते.

सत्कारास उत्तर देताना स्वीकारताना बालाजी सोनटक्के म्हणाले की, हा विजय म्हणजे फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा विजय आहे. सर्व जनतेने ही निवडणूक हाती घेतली होती. माझी काम करण्याची पद्धत ही जनतेला आवडल्याने त्यांनी मला पसंती दिली. जनतेने माझ्यावर टाकलेली

जबाबदारी मी पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडेन. पाणी, आरोग्य, स्वच्छता आणि रस्ते या मूलभूत प्रश्नांवर प्राधान्याने काम करणार आहे. अट्टलमत व पत्रकार संघटनेतर्फे झालेला हा सत्कार आगळावेगळा आणि हृदयस्पर्शी असल्याचे सांगत त्यांनी सर्व पत्रकार बांधवांचे आभार मानले.

प्रमुख पाहणे म्हणून एस. के. बावस्कर, कार्याध्यक्ष अट्टलमतचे कार्यकारी संपादक रशपालसिंग अट्टल, वरिष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे, मनीष अग्रवाल उपस्थित होते.

यावेळी वरिष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सोनटक्के यांची समाजाशी नाळ घट्ट जोडलेली आहे. पोलीस सेवेत असताना त्यांनी लोकांशी सलोख्याचे संबंध ठेवले आणि मानवी दृष्टिकोन जपला; त्यामुळेच जनतेने त्यांच्यावर विश्वास दाखवला. अध्यक्षीय भाषणात रतनकुमार साळवे म्हणाले की, सहाय्यक पोलीस आयुक्त पदावर कार्यरत असतानाही सोनटक्के यांचे पाय कायम जमिनीवर राहिले. त्यांनी कधीही अहंकार दाखवला नाही, कोणावर अन्याय होऊ दिला नाही आणि गुन्हेगारांविरुद्ध कठोर भूमिका घेतली. त्यांची कारकीर्द निष्कलंक व प्रेरणादायी राहिली आहे. समाजाच्या विकासासाठी फुले- शाहू-आंबेडकरांच्या विचारांवर चालणे हाच खरा मार्ग असल्याचेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी अट्टलमतचे कार्यकारी संपादक दिनेश परदेशी, फिरोजखान, ग. मा. पिंजरकर, प्रवीण बोरुडे, जितेंद्र भवरे, प्रकाश खजिनकर, नितीन दांडगे, आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून, उपस्थितांनी बालाजी सोनटक्के यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

माणूस सरळ असला की त्याला फसवणाऱ्यांची संख्या जास्त असते. शब्दांचे जाळ फेकून समोरच्याला कसे आकर्षित करावे ही कला त्या फसव्या व्यक्तीला अवगत असते. त्यामुळे अशा व्यक्तींपासून सावध राहिले पाहिजे. बालाजी सोनटक्के ही व्यक्ती सरळ आहे त्यांना जास्त आडवेडे घेता येत नाही. परंतु फसव्या लोकांनी हे विसरू नये की ते शिस्तप्रिय देखील आहेत आणि धोखेबाज, धुर्त, आणि कपटी लोकांना ते चांगल्या प्रकारे ओळखतील, अशी प्रतिक्रिया एका वरिष्ठ पत्रकाराने कार्यक्रमानंतर खासगीत दिली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही
(यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199